नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १४८ Issue - 148 | वार - शनिवार दि. २४ ऑक्टोबर २०२६ Blow- Saturday Date 24 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# फटाक्यांच्या स्फोटांनी गाव हादरलं, ७ जणांचा करुण अंत

## बिहारच्या फटाका कारखान्याततत स्फोट; एकाच कुटुंबातील पाच जण ठार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पाटणा: फटाके तयार केले जात असताना मोठ्या आवाजासह स्फोट झाला. या स्फोटात सात जणांनी जीव गमावला. एका घरात फटाके बनवले जात होते. तितक्यात मोठ्या आवाजासह स्फोट झाला. त्यात अनेक जण जखमी झाले. त्यांना रुग्णवाहिकेतून जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं. स्फोटानंतर आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या गाड्या गावात दाखल झाल्या. बिहारच्या सिवान जिल्ह्यात ही दुर्घटना घडली.



जामो पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या आलमपूर गावात शुक्रवारी एका घरात फटाके तयार करण्याचं काम सुरू होतं. तितक्यात फटाक्यांना आग लागली आणि स्फोट झाला. या स्फोटात सात जणांचा दुर्दैवी अंत झाला. मोहम्मद अमीरद्दीन मियाँ यांच्या घरात ठेवण्यात आलेल्या फटाक्यांचा स्फोट झाला. त्यानंतर सातत्यानं स्फोट सुरू झाले, अशी माहिती समोर आली आहे.

मोहम्मद अमीरुद्दीन मियाँ फटाक्यांचा व्यवसाय करतात. दिवाळी जवळ आल्यानं फटाके तयार करण्याचं काम वेगात सुरू होतं. फटाके तयार केले जात असताना त्यांना आग लागली. यानंतर मोठा स्फोट झाला. यात मोहम्मद अमीरुद्दीन, त्याच्या तीन नाती, एक नातू आणि दोन मजुरांचा मृत्यू झाला.

स्फोटाची तीव्रता अतिशय जास्त होती. त्यामुळे घराचा पुढील भाग रस्त्यावर कोसळला. जवळपास दोन तास सलग स्फोट सुरू होते. यामुळे मृतदेह अक्षरश: छिन्नविच्छिन्न झाले. ते ओळखण्यात अडचणी येत आहेत. स्फोटानंतर परिसरात एकच गोंधळ झाला. आसपासच्या लोकांची पळापळ सुरू झाली. गावात दहशत पसरली.

घटनेची माहिती मिळताच डऊच्् आशुतोष गुप्ता आणि ऊच्् विजय प्रकाश मीणा गावात पोहोचले. त्यांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. आग विझवल्यानंतर घरातील मृतदेह बाहेर काढले गेले. स्फोट झालेल्या घरासह गावात अनेक पोलीस ठाण्यांचे कर्मचारी तैनात आहेत.

घटनेचं गांभीर्य पाहता पोलीस अध-ीक्षक भारत सोनी यांनी बेजबाबदारपणा आणि अकार्यक्षमतेचा ठपका ठेवत जामो बाजारचे पोलीस प्रभारी आणि स्थानिक चौकीदार चंद्राका मांझी यांना तातडीनं निलंबित केलं आहे.

# उजनीतून पिण्यासाठी भीमा नदीपात्रात पाणी सोडले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



प्रतिनिधी/पंढरपूर : सोलापूर जिल्ह्यातील पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर झाला असल्याने उजनी धरणातून भीमा नदी पात्रात चार टीएमसी पाणी सोडण्यात येणार आहे. सोलापूर ,सांगोला, मंगळवेढा, सरांसह १०५ गावांचा पिण्याच्या पाण्यासाठी हा विसर्ग करण्यात येणार आहे. दिनांक २३ शुक्रवार रोजी सकाळी दहा वाजता वीज निर्मितीद्वारे १६००० क्युसेस वेगाने भीमा नदी पात्रात पाणी सोडण्यास सुरुवात झाली. सोलापूर जिल्ह्यात यंदा सरासरी-पेक्षा ५० टक्के पेक्षा कमी पाऊस झाल्याने पाणी टंचाईची संकट अधिक गरज झाली आहे. महाराष्ट्र राज्य शासनाने सोलापूर जिल्ह्यात ११ तालुके दुष्काळग्रस्त जाहीर केले आहेत. त्यातच भूजल पातळी एक ते दीड मीटरने खलावलेले पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे या पार्श्वभूमीवर उजनी धरणातील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्यात आले आहे.

**सोलापूर, पंढरपूर सांगोल्यास १०५ गावांच्या पिण्याच्या पाण्यासाठी विसर्ग सुरू**

उजनी धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाणी ही पिण्यासाठी सोडण्यात येणार आहे केवळ याचा वापर पिण्यासाठी व्हावा यासाठी नदीकाठच्या भागातील वीजपुरवठा खंडित करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत. नदीपात्रातून शेतीसाठी पाणी उपसा होऊ नये यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आदेश देण्यात आले आ-हेत. केवळ नदीकाठच्या भागात वीजपुरवठा दोन तास ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

उजनी धनातून सोडण्यात येणारी चार टीएमसी पाणी पुढील चार महिने पुरवण्याचे नियोजन आहे. नदीपत्रात बंधाऱ्यांमध्ये पाणी अडवून त्याचा उपयोग संबंधित योजनेच्या पाणीपुरवठासाठी करण्यात येणार आहे. सुरुवातीला वीज निर्मिती द्वारे कमी पाणी सोडण्यात येणार आहे. टप्प्याटप्प्याने विसर्ग वाढवून पाच ते सहा हजार ट्युसेस नेण्याची नियोजन असल्याची माहिती देण्यात आली आहे. दरम्यान उजनी धरणामध्ये सध्या ७७% पाणीसाठा शिल्लक आहे. उपयुक्त पाणीसाठा ४२ टक्के टीएमसी असल्याची माहिती आहे. जिल्ह्याची पाण्याची पाण्याची गरज लक्षात घेऊन नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# एमपीएससी पेपरफुटी प्रकरणात आयोगातील सहायक कक्ष अधिकाऱ्याला अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या औषध निरीक्षक (ड्रग इन्स्पेक्टर) पदाच्या परी-क्षा प्रश्नसंच फुटी प्रकरणी विशेष तपास पथकाने (एसआयटी) मोठी कारवाई करत आणखी दोन मुख्य आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. यामध्ये आयोगात कार्यरत असणारा सहायक कक्ष अधिकारी रोहित कोलटक्केला पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईमुळे या हायप्रोफाईल पेपरफुटी प्रकरणातील एकूण अटक आरोपींची संख्या आता १३ वर पोहोचली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे अन्न व औषध प्रशासन संवर्गातील औषध निरीक्षक, गट-ब या पदांच्या १५४ जागांसाठी (जाहिरात क्र. ११६/२०२५) २२ मार्च २०२६ रोजी राज्यातील ६ विविध परीक्षा केंद्रांवर चाळणी परीक्षा घेण्यात आली होती. मात्र, या परीक्षेदरम्यान शासकीय गोपनीयतेचा आणि निष्पक्षतेचा भंग करून, पदाचा गैरवापर करत आर्थिक फायद्यासाठी प्रश्नसंचाची अनधिकृत देव-ाणघेवाण झाल्याचे तपासात उघडकीस आले. विशेष तपास पथकाने केलेल्या तांत्रिक व गुप्त तपासात एमपीएससीच्या गोपनीय कक्षातूनच तज्ज्ञांनी निवडलेला प्रश्नसंच आर्थिक फायद्यासाठी बाहेर काढल्याचे निष्पन्न झाले होते. यापूर्वीच या प्रकरणात एमपीएससीचे अवर सचिव अभिजीत लेंडवे , गोपनीय कक्षातील सहायक कक्ष अधिकारी विश्वेश्वर नकाते आणि गोपाळ मराठे यांच्यासह कौटिल्य अकॅडमीचा संचालक प्रविण पाटील आणि इतर मध्यस्थांना अटक करण्यात आली होती. तसेच, बेकायदेशीरपणे प्रश्नसंच मि ळवून परीक्षा देणारे उमेदवार ऋतुजा पाटील, साजिद संदे आणि विजय किंगर यांनाही बेड्या ठोकण्यात आल्या होत्या. गुन्ह्याचा पुढील सखोल तपास सुरू असताना, उम ेदवारांना गैरमार्गाने प्रश्नसंच उपलब्ध करून देणारा मुख्य मध्यस्थ आरोपी मयुर ठाकरे याला विशेष तपास पथकाने १२ ऑक्टोबर २०२६ रोजी अटक केली. त्यानंतर तप-ासाचे धागेदोरे पुढे नेले असता, मुख्य आरोपी अभिजीत लेंडवे याच्याकडून थेट प्रश्नसंच प्राप्त करणारा एमपीएससीचा आणखी एक सहायक कक्ष अधिकारी रोहित कोलटक्के याचे नाव समोर आले. एसआयटीने अत्यंत शिताफीने कारवाई करत २३ ऑक्टोबर २०२६ रोजी रोहित कोलटक्के याला नवी मुंबई येथून ताब्यात घेतले व अटक केली. आयोगाच्या स्वतः च्याच अधिकाऱ्यांचा आणि कर्मचाऱ्यांचा या रॅकेटमध्ये थेट सहभाग समोर आल्याने स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या हजारो परीक्षार्थींमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

# परीक्षा अर्जासाठी 'झिरो चलन' सुविधा उपलब्ध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**दुष्काळग्रस्त तालुक्यांतील २,४०,३६५ विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कमाफीचा दिलासा**

मुंबई : दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने परीक्षा शुल्कमाफीचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून, आतापर्यंत तब्बल २ लाख ४० हजार ३६५ विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्काचा एकही रुपया न भरता 'झिरो चलन' सुविधेद्वारे परीक्षा अर्ज दाखल केले आहेत, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींमुळे शिक्षणात अडथळे येऊ नयेत, या उद्देशाने विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारू नये, असा शासनाने निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी सुरळीतपणे व्हावी आणि पात्र विद्यार्थ्यांना सवलतीचा लाभ मिळावा, यासाठी संचालनालय, विद्यापीठे आणि परीक्षा विभागाच्या स्तरावर आवश्यक यंत्रणा कार्यरत करण्यात आली आहे. या प्रक्रियेचा विभागाकडून सातत्याने आढावा घेतला जात आहे.



परीक्षा अर्ज भरताना विद्यार्थ्यांना शुल्क भरावे लागू नये, यासाठी अर्ज प्रक्रियेत 'झिरो चलन' हा पर्याय उप-लब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे पात्र विद्यार्थ्यांना कोणतेही परीक्षा शुल्क न भरता परीक्षा अर्ज दाखल करता येत आहेत. तसेच, सर्व विद्यापीठांनी परीक्षा शुल्कमाफीच्या अंम लबजावणीसंदर्भात परिपत्रके जारी केली आहेत.

दरम्यान, ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी परीक्षा शुल्क भरले आहे, त्यांना भरलेले शुल्क परत करण्याची प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे. दुष्काळग्रस्त भागातील कोणताही पात्र विद्यार्थी परीक्षा शुल्कमाफीच्या लाभापासून वंचित राहू नये, तसेच विद्यार्थ्यांना या सवलतीचा लाभ घेताना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सर्व विद्यापीठांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीसंदर्भात शैक्षणिक अडचण असल्यास संबंधित विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ किंवा जनसंपर्क अधिकारी, विद्यार्थी विकास विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन उच्च व इतर तंत्र शिक्षण विभागाने केले आहे.

विद्यापीठनिहाय संपर्क अधिकारी : मुंबई विद्यापीठ, मुंबई - परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. पूजा रौंदळे (९३२२०२०५८९), जनसंपर्क अधिकारी लीलाधर बनसोड (९८३३९६९९७७).

सावित्रीबाई फुले पुणे विद्या-पीठ, पुणे - परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. राजेंद्र तलवारे (९८९०६४२४३१), विद्यार्थी विकास संचालक डॉ. सविता कुलकर्णी (७७२००३६७७४), तसेच अजय ठुबे (७५८८१६९१३४).

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंग एन. जाधव (९५४५५९५९९९), विद्यार्थी विकास संचालक अलोक जत्राटकर (८६९८९२८०८०).

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर - परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अंधारे (९९७५०५५१५५), विद्यार्थी विकास संचालक डॉ. काळवणे (७०२०६३४५०२).

**चिन्मय अमृत महोत्सवात पंतप्रधान नरेंद्र मोदींचे महत्त्वाचे भाषण**

# देशाच्या विकासासाठी एकत्र या : प्रधानमंत्री मोदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आपण जो 'अमृत महोत्सव' साजरा केला, तो केवळ एक सोहळा नव्हता. तर तो आपल्या जुन्या मूल्यांची ओळख करून देत, २०४७ पर्यंत भारताला एक विकसित देश बनवण्याचा भक्कम पाया आहे, असे विचार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी व्यक्त केले. नवी दिल्लीतील 'भारत मंडपम' येथे 'चिन्मय अमृत महोत्सव ग्लोबल संमेलन' पार पडले. या भव्य कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान म्हणाले की, देशातील प्रत्येक नागरिकाचा सहभाग, स्वावलंबन आणि तरुण पिढीच्या ताकदीवरच भारत आपल्या स्वातंत्र्याच्या शंभराव्या वर्षी (२०४७ मध्ये) संपूर्ण जगभरात एक महान विकसित देश म्हणून ओळखला जाईल.

आपल्या भाषणामध्ये बोलताना पंतप्रधान मोदी यांनी आजच्या काळातील काही नवीन आव्हानांवर आणि सामाजिक समस्यांवर चिंता व्यक्त केली. देशात आणि समाजात फूट पाडणाऱ्या लोकांपासून किंवा शक्तींपासून सर्वांनी दूर राहिले पाहिजे आणि त्यांच्याविरोधात एकत्र येऊन उभे राहिले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, देशातील प्रत्येक व्यक्तीला स्वावलंबी बनवण्याची आज नितांत गरज आहे. विशेष योगायोग म्हणजे, २०४७ मध्ये भारत जेव्हा स्वातंत्र्याची १०० वर्षे पूर्ण करेल, त्याच वेळी 'चिन्मय मिशन'ची स्थापना होऊनही १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे देशाच्या या मोठ्या प्रवासात सर्वांनी मिळून उत्साहाने योगदान दिले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.



या कार्यक्रमाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे, आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेऊन पूज्य स्वामी चिन्मयानंद यांची 'हॅलोग्राफिक प्रतिमा' (हवेमध्ये जिवंत भासणारी आकृती) तयार करण्यात आली होती. या डिजिटल रूपात समोर असलेल्या स्वामीजींशी संवाद साधताना पंतप्रधान मोदी काही क्षण भावुक झाले आणि त्यांनी ३३ वर्षांपूर्वीच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. १९९३ मध्ये वडोदरा येथे स्वामीजींची झालेली भेट, त्यांच्याशी झालेली चर्चा आणि त्यांचा आशीर्वाद याची आठवण काढत पंतप्रधान म्हणाले की, त्या भेटीदरम्यान तरुण पिढीला (युवाशक्तीला) सक्षम बनवून एक मजबूत भारत कसा घडवता येईल, यावर मुख्य चर्चा झाली होती. त्यानंतर काही वर्षांतच जनतेच्या आशीर्वादामुळे मला गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून देशसेवा करण्याची संधी मिळाली, अशी भावनिक आठवण त्यांनी सांगितली.

गेल्या २५ वर्षांपासून सरकारमध्ये प्रमुख पदावर काम करताना आपल्या प्रत्येक निर्णयाच्या केंद्रस्थानी नेहमी 'तरुण पिढी' (युवाशक्ती) राहिली आहे, असे पंतप्रधानांनी आवर्जून सांगितले. यावेळी त्यांनी चिन्मय मिशनच्या तरुण सदस्यांचे भरभरून कौतुक केले. या संस्थेच्या तरुणांनी जवळपास ३०० दिवसांत तब्बल ४० हजार किलोमीटरचा प्रवास करून देशा-तील १ लाखांहून अधिक युवकांपर्यंत राष्ट्रउभारणीचा संदेश पोहोचवला आहे, हे कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, देशात आणलेली नवीन 'राष्ट्रीय शिक्षण नीती' ही आपल्या प्रा-चीन ज्ञानपरंपरा, मातृभाषेतील शिक्षण आणि आजचे आधुनिक तंत्रज्ञान या सर्वांचा अगदी अचूक मेळ घालणारी आहे, असेही त्यांनी सांगितले.

चिन्मय मिशन ही केवळ एक सामान्य संस्था नाही, तर ती वेदान्त तत्त्वज्ञानाचा प्रचार करणाऱ्या स्वामी चिन्मयानंद यांच्या महान विचारांचे एक जिवंत प्रतीक आहे, अशा शब्दांत पंतप्रधानांनी या आध्यात्मिक संस्थेचा गौरव केला. या सुंदर महोत्सव-ात सहभागी होणे हा आपल्यासाठी एक अतिशय आनंददायी आणि आध्यात्मिक अनुभव होता, असे सांगत त्यांनी देशातील सर्व सामाजिक आणि धार्मिक संस्थांना 'अमृत संकल्पां'च्या माध्यमातून देशसेवेच्या कामात एकत्र येण्याचे आवाहन केले.

**अंतिम आकडेवारी छाननीनंतर जाहीर होणार**

# विधानपरिषद निवडणुकीत अमरावती शिक्षक मतदारसंघात ९१ टक्के तर नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात ६४ टक्के मतदानाची नोंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र विधानपरिषदेच्या तीन पदवीधर व दोन शिक्षक मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान पार पडले. उपलब्ध तात्पुरत्या आकडेवारीनुसार अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात ९१ टक्के, तर पुणे विभाग शिक्षक म तदारसंघात ८५ टक्के मतदानाची नोंद झाली आहे.

सायंकाळी ४ वाजेपर्यंतच्या उपलब्ध आकडेवारीनुसार नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात ६४ टक्के, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात ६२ टक्के आणि औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघात ५८ टक्के मतदान झाले आहे.

मतदानाची ही आकडेवारी तात्पुरती असून, मतदान पथके परतल्यानंतर त्यांच्याकडील नम ुना १७-सीची छाननी करण्यात येणार आहे.

ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम मतदानाची टक्केवारी उप-लब्ध होणार आहे. त्यामुळे अंतिम आकडेवारी अधिकृतरीत्या जाहीर झाल्यानंतरच मतदानाचे अंतिम प्रमाण स्पष्ट होईल, असे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने कळविले आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

शनिवार दि. २४ ऑक्टोबर २०२६ 

## संपादकीय....

### विद्यार्थ्यांना दिलासा

दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने परीक्षा शुल्कमाफीचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून, आतापर्यंत तब्बल २ लाख ४० हजार ३६५ विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्काचा एकही रुपया न भरता 'झिरो चलन' सुविधेद्वारे परीक्षा अर्ज दाखल केले आहेत. दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींमुळे शिक्षणात अडथळे येऊ नयेत, या उद्देशाने विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारू नये, असा शासनाने निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी सुरळीतपणे व्हावी आणि पात्र विद्यार्थ्यांना सवलतीचा लाभ मिळावा, यासाठी संचालनालय, विद्यापीठे आणि परीक्षा विभागाच्या स्तरावर आवश्यक यंत्रणा कार्यरत करण्यात आली आहे. या प्रक्रियेचा विभागाकडून सातत्याने आढावा घेतला जात आहे. परीक्षा अर्ज भरताना विद्यार्थ्यांना शुल्क भरावे लागू नये, यासाठी अर्ज प्रक्रियेत 'झिरो चलन' हा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे पात्र विद्यार्थ्यांना कोणतेही परीक्षा शुल्क न भरता परीक्षा अर्ज दाखल करता येत आहेत. तसेच, सर्व विद्यापीठांनी परीक्षा शुल्कमाफीच्या अंमलबजावणीसंदर्भात परिपत्रके जारी केली आहेत. दरम्यान, ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी परीक्षा शुल्क भरले आहे, त्यांना भरलेले शुल्क परत करण्याची प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे.

# भाळवणीत श्री भवानी देवीची यात्रा उत्साहात होणार; विविध स्पर्धांचे आयोजन

## लेझीम, गजीढोल, भेदीगाणी व धनगरी ओव्यांच्या स्पर्धांनी यात्रेची रंगत वाढणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री भवानी देवीच्या कृपेने पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथे रविवार, दि. २५ ऑक्टोबर ते सोमवार, दि. २६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत श्री भवानी देवीची यात्रा मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. या यात्रेनिमित्त धार्मिक कार्यक्रमांसह विविध पारंपरिक लोककला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

यात्रेच्या पहिल्या दिवशी, रविवार दि. २५ ऑक्टोबर रोजी पहाटे ५ वाजता श्रींची महापूजा व अभिषेक होणार आहे. त्यानंतर सायंकाळी ५.३० वाजता महापूजेचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री ८ वाजता छबिना कार्यक्रम होणार असून, भाविकांना देवीच्या दर्शनाचा लाभ घेता येणार आहे.

सोमवार, दि. २६ ऑक्टोबर रोजी पहाटे ५ वाजता श्रींची महापूजा व अभिषेक होईल. सकाळी ९ वाजल्यापासून पारंपरिक स्पर्धांना सुरुवात होणार असून, सायंकाळी ५ वाजल्यापासून बक्षीस वितरण समारंभ होणार आहे. त्यानंतर सायंकाळी ५.३० वाजता श्रींची महापूजा होईल.

पारंपरिक लोककलांना मिळणार व्यासपीठ

यात्रेनिमित्त लेझीम स्पर्धा, गजीढोल स्पर्धा तसेच धनगरी ओव्या व भेदीगाणी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. लेझीम स्पर्धेसाठी ११,१११ रुपये, गजीढोल स्पर्धेसाठी २,५०१ रुपये, तर धनगरी ओव्या व भेदीगाणी स्पर्धेसाठी ५०१ रुपये मानधन जाहीर करण्यात आले आहे. या स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील पारंपरिक लोककला आणि सांस्कृतिक परंपरांना प्रोत्साहन मिळणार आहे.

यात्रेच्या नियोजनासाठी आयोजकांनी भाविकांना व स्पर्धकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या कलाकारांनी गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता पासून दुपारी १ वाजेपर्यंत आपली नावे नोंदवावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धकांची संख्या वाढल्यास आयोजकांच्या निर्णयानुसार नियोजन करण्यात येणार आहे.

यात्रेनिमित्त रविवार, दि. २५ ऑक्टोबर रोजी आठवडा बाजार यात्रेच्या ठिकाणी भरणार असल्याची माहितीही पत्रकाद्वारे देण्यात आली आहे

यात्रेत येणाऱ्या व्यापाऱ्यांनी, किरकोळ धंदेवाल्यांनी जागेच्या वाटपासाठी गुरुवार दिनांक २२/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजले पासून दुपारी ०१:०० वाजेपर्यंत यात्रेच्या ठिकाणी हजर रहावे. जागेसाठी योग्य भाव आकारला जाईल. तरी सर्वांनी हजर रहावे. हजर न राहिल्यास यात्रा कमिटी जी जागा देईल ती घ्यावी लागेल, याची नोंद घ्यावी, तरी यात्रेला शोभा आणावी ही विनंती

या यात्रेचे संयोजन ग्रामपंचायत भाळवणी, समर्थ ग्रामस्थ व भक्तगण यांच्या वतीने करण्यात येत आहे. उपसरपंच नितीन पांडुरंग शिंदे आणि सरपंच रणजित नानासाहेब जाधव, यात्रा कमिटी यांच्यासह भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून यात्रेची शोभा वाढवावी, असे आवाहन केले आहे.

# झोपडपट्टीवासीयांना सर्व काही मोफत मिळत आहे आणि त्यांना शहरातील मोक्याच्या भागांमध्येच पुनर्वसन हवं आहे : मुंबई उच्च न्यायालयाची टिप्पणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : झोपडपट्टीवासीयांना सर्व काही मोफत मिळत आहे आणि त्यांना शहरातील मोक्याच्या भागांमध्येच त्यांचे पुनर्वसन हवे आहे. मात्र, शहर स्वच्छ ठेवणे हे त्यांचेही समान नागरी कर्तव्य आहे, हे ते विसरतात. अशा शब्दात सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या झोपडपट्टी वासियांना उच्च न्यायालयाने सुनावलं. झोपडपट्टीवासीय हे शहराच्या एकूण लोकसंख्येचा अविभाज्य भाग असले, तरी इतर नागरिकांच्या स्वच्छ आणि आरोग्यदायी परिसरात राहण्याच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन करण्याचा अधिकार त्यांना नाही, असंही उच्च न्यायालयाने म्हटलं आहे.

रस्त्यावर कचरा फेकणाऱ्या झोपडपट्टी धारकांना मुंबई उच्च न्यायालयाने इशारा दिला आहे. झोपडपट्ट्यांमध्ये साफसफाईसाठी जाणाऱ्या महापालिका कर्मचाऱ्यांची अडवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे उच्च न्यायालयाचे संकेतही दिले आहेत. असं करणाऱ्या रहिवाशांचे पुनर्वसन प्रकल्पातील स्थायी पर्यायी निवासाच्या करारनाम्याचे हक्क जप्त करता येतील का? अशी विचारणा मुंबई उच्च न्यायालयाचने एसआरए प्राधिकरणाला केली आहे. यासंदर्भात भूमिका स्पष्ट करण्याचे प्राधिकरणाला आदेश देण्यात आले आहेत.

दरम्यान, केवळ विवाहासाठी धर्मांतर करता येणार नाही, असे मुंबई उच्च न्यायालयाने म्हटलं आहे. महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम, २०२६ ला आव्हान देणारी याचिका मागे घेण्यात आली आहे. तथापि, आवश्यक तथ्यांसह नव्याने याचिका दाखल करण्याची मुभा देण्यात आली आहे.

कायद्याच्या घटनात्मक वैधतेला ठाण्यातील ७० वर्षीय मुस्लिम धर्मोपदेशकाने आव्हान दिले होते. याचिकेत ठोस तथ्यांचा अभाव असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. न्यायालयाने निरीक्षण नोंदवताना सांगितले की, प्रत्येक व्यक्तीला धर्म बदलण्याचे स्वातंत्र्य आहे. मात्र, केवळ विवाहासाठी धर्मांतर करता येणार नाही, असे न्यायालयाने निरीक्षण नोंदवले.

# बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र; ओडिशा, आंध्र प्रदेशात मुसळधार पावसाचा अंदाज, महाराष्ट्रात उष्णता कायम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : बंगालच्या उपसागरातील हवामानात बदल होत असून, पूर्व भारतातील काही राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कमी दाबाचे क्षेत्र अधिक तीव्र होण्याचा अंदाज असल्याने ओडिशा आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टी भागांतील हवामानावर लक्ष ठेवले जात आहे. दुसरीकडे, महाराष्ट्रात उष्ण आणि कोरडे हवामान कायम राहण्याची शक्यता असून, कोकणातील काही भागांत हलक्या पावसाचा अंदाज आहे.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचे क्षेत्र अधिक तीव्र होऊन 'डीप डिप्रेशन'मध्ये रूपांतरित होऊ शकते. या प्रणालीच्या पुढील हालचालींवर हवामान विभाग लक्ष ठेवून आहे. २७ आणि २८ ऑक्टोबरदरम्यान ओडिशा आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टी भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

या हवामान प्रणालीमुळे पश्चिम बंगाल, बिहार आणि झारखंडमधील काही भागांमध्येही पावसाचा प्रभाव जाणवू शकतो. संबंधित राज्यांतील नागरिकांनी हवामान विभागाच्या अधिकृत सूचनांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचे क्षेत्र तीव्र झाल्यास हवामानात आणखी बदल होऊ शकतात. मात्र, कमी दाबाचे क्षेत्र किंवा 'डीप डिप्रेशन' निर्माण होणे म्हणजे चक्रीवादळ तयार झालेच, असे नाही. त्यामुळे चक्रीवादळाची निर्मिती, त्याची दिशा आणि संभाव्य परिणाम याबाबत अधिकृत अंदाज महत्त्वाचा ठरणार आहे.

ओडिशा आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टी भागांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता लक्षात घेता, नागरिकांनी स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे आणि आवश्यक ती खबरदारी घ्यावी.

पूर्व भारतात पावसाची शक्यता असताना महाराष्ट्रातील हवामान वेगळे राहण्याचा अंदाज आहे. मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड या भागांत उष्ण व दमट हवामान जाणवू शकते. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. कोल्हापूर, सांगली आणि घाटमाथ्याच्या भागांतही तुरळक सरी पडू शकतात.

मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी तापमानातील बदल लक्षात घेऊन बाहेर पडताना आवश्यक ती काळजी घ्यावी.

ऑक्टोबरच्या अखेरीसही उष्णतेचा प्रभाव जाणवत असल्याने थंडीची चाहूल कधी लागणार, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. एल निनोचा जागतिक हवामानावर परिणाम होऊ शकतो; मात्र महाराष्ट्रात थंडी नेमकी किती उशिरा सुरू होईल किंवा हिवाळ्यात तापमान किती राहील, याबाबत ठाम निष्कर्ष काढण्यासाठी अधिकृत हंगामी अंदाज आवश्यक आहे.

पुढील काही दिवस बंगालच्या उपसागरातील हवामान प्रणाली आणि महाराष्ट्रातील तापमानातील बदल यावर लक्ष ठेवावे लागणार आहे. नागरिकांनी प्रवासाचे नियोजन करताना हवामान विभागाचे ताजे जिल्हानिहाय अंदाज तपासावेत.

# खामसवाडी येथे जगदंबा विद्यालयात १० विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे/खामसवाडी प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित जगदंबा माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आज गुरुवार दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी विद्यार्थ्यांना १० सायकलींचे वाटप करण्यात आले.




ग्रामशक्ती वेल्फेअर फाउंडेशन अंबाजोगाई जिल्हा बीड यांच्या सहकार्याने आणि शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर गुरुजी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष ज्योतीराम सोनके आणि सचिव प्राध्यापक भागवत गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ५० टक्के लोकवाटा पालकांचा आणि ५० टक्के वाटा फाउंडेशनचा या तत्वावर १० सायकलींचे वाटप करण्यात आले.

यामध्ये इयत्ता पाचवीची योगिता बापूराव गंभीरे, प्रतीक प्रदीप सोनार, अंजली आबाराव पाटोळे, इयत्ता सहावीची सिफा अजीम बेग, नम्रता संजय घोळवे, ऋषिकेश विकास पाटोळे, संतोष सुनील शिंदे, इयत्ता सातवीचा अर्जुन श्रावण पाटोळे, उषा सुभाष शेळके आणि इयत्ता आठवीची अंकिता निशिकांत महाजन या विद्यार्थ्यांना सायकली देण्यात आल्या. सायकल मिळाल्याने लांबून येणाऱ्या विद्यार्थ्यांची शाळेत येण्याची अडचण दूर होणार आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामशक्ती वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष सोनके सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जगदंबा शिक्षण प्रसारक संस्थेचे ज्येष्ठ संचालक रामराजे काका शेळके होते. यावेळी संस्थेचे ज्येष्ठ संचालक रामभाऊ शेळके, सहसचिव किशोर त्रिंबकराव शेळके, संचालक सुनील पाटील, सुरेश यादव, खामसवाडीचे उपसरपंच दयानंद पाटील, अजित अशोकराव शेळके, पत्रकार शिवाजी बोबडे, पत्रकार गोपाळ शेळके, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राहुल चौरे, सावता माळी, लक्ष्मण शिरसठ, दिगंबर शेळके, सतीश तांबारे, मनोज शेळके, दिलीप घोळवे, सतीश माने, अजय शेळके, श्रावण पाटोळे, विकास पाटोळे, रोहिणी सोनार, विद्यार्थ्यांचे पालक, शाळेच्या मुख्याध्यापिका सावंत मॅडम, सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# लामजनापाटी येथे शेतकरी संघटनेच्या वतीने स्मार्ट मीटरची होळी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातुर प्रतिनिधी/अमर जाधव : महावितरणच्या धोरणाचा निषेध...विना परवानगी बसवलेले स्मार्ट मीटर काढून पूर्वीचे पोस्टपेड मीटर बसविण्याची मागणी; आसूड वाजवून प्रशासनाला इशारा



लामजना, दि. २२ ऑक्टोबर : ग्राहकांच्या पूर्वपरवानगीशिवाय बसविण्यात आलेले स्मार्ट मीटर काढून त्याऐवजी पूर्वीचे पोस्टपेड मीटर बसवावेत, या मागणीसाठी शेतकरी संघटना लातूर जिल्ह्याच्या वतीने गुरुवारी महावितरण कार्यालय, लामजना येथे स्मार्ट मीटरची होळी करून तीव्र आंदोलन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून आंदोलनाला सुरुवात करण्यात आली. यावेळी आंदोलकांनी महावितरण कार्यालयासमोर सुमारे दोन तास ठिय्या मांडून महावितरणच्या धोरणाचा निषेध केला.

महावितरणकडून ग्राहकांच्या पूर्वपरवानगीशिवाय स्मार्ट मीटर बसविण्यात येत असल्याचा आरोप करत, असे मीटर तात्काळ काढून पूर्वीचे पोस्टपेड मीटर बसविण्यात यावेत,कारण हे स्मार्ट मिटर बसविल्या पासून विज बिलात दुपटीने वाढ झाली आहे.ही ग्राहकांची महावितरण कंपनीने केलेली स्मार्ट लूट चालू केली आहे.त्यामुळे हे मिटर काढून पुर्वीचे मिटर बसवावे अशी मागणी आंदोलकांनी केली. वीज ग्राहकांना विश्वासात न घेता राबविण्यात येणाऱ्या धोरणामुळे ग्राहकांमध्ये नाराजी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. ग्राहकांच्या तक्रारींची दखल घेऊन महावितरणने तातडीने योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणीही करण्यात आली.

यावेळी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आसूड वाजवून प्रशासनाचे लक्ष वेधले. प्रशासनाने कायद्याने वागावे; अन्यथा हा आसूड अधिकाऱ्यांना सरळ करण्यासाठी वापरावा लागेल, असा इशारा शेतकरी संघटनेच्या वतीने देण्यात आला. शेतकरी आणि वीज ग्राहकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनात शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक पाटील, भारतीय किसान युनियनचे प्रदेश प्रवक्ते राजकुमार सस्तापुरे, शेतकरी संघटनेचे युवा जिल्हाध्यक्ष रुपेश शंके, स्वभाव जिल्हाध्यक्ष कल्याण आप्पा हुरदळे, भारतीय किसान युनियनचे युवा जिल्हाध्यक्ष विवेक पाटील, तसेच दतु मुगळे, वसंत कंदगुळे, रामराव मेळकुंदे, धोंडीराम पाटील, अजिंक्य पाटील, लहु आळणे, दगडूसाहेब पडीले, करण भोसले, शिवाजी हाजारे, बाबासाहेब कंदगुळे, दत्तु कंदगुळे, जनार्दन कंदगुळे, शाम परिहार, पवन जाधव, दयानंद जाधव, नागनाथ बके, मनोहर पाटील, परमेश्वर मोरे, आदित्य वाघमारे, शत्रुघ्न कंदगुळे आदींसह शेकडो शेतकरी सहभागी झाले होते.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या ३३ वे राज्यस्तरीय अधिवेशन शिर्डी....पुरस्कारासाठी प्रस्तावांची मागणी : ११ नोव्हेंबर पर्यंत मुदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई / प्रतिनिधी : पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींच्या कार्याला न्याय देण्याचे काम सातत्याने करणाऱ्या महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्यस्तरीय पुरस्कार – २०२६ चे वितरण करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येत असल्याची माहिती संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी दिली.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अनेक व्यक्ती प्रसिद्धीपासून दूर राहून आपापल्या क्षेत्रात प्रामाणिकपणे आणि समाजहितासाठी कार्य करत असतात. अशा निस्वार्थी आणि प्रेरणादायी कार्याचा गौरव व्हावा, त्यांच्या कार्याला राज्यस्तरावर ओळख मिळावी आणि त्यातून इतरांनाही प्रेरणा मिळावी, या उदात्त हेतूने हे पुरस्कार दिले जातात. गेल्या अनेक वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबविला जात असून, राज्यभरातील अनेक मान्यवरांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

कोणत्या क्षेत्रातील प्रस्ताव पाठविता येतील ?

या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी खालील क्षेत्रात विशेष आणि उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्ती, संस्था, शेतकरी, उद्योजक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते यांनी आपले प्रस्ताव पाठवावेत.

१. शैक्षणिक क्षेत्र : शिक्षण क्षेत्रात नाविन्यपूर्ण प्रयोग, गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी केलेले कार्य.

२. सामाजिक क्षेत्र : समाजातील अनाथ, अपंग, महिला, वंचित घटकांसाठी केलेले उल्लेखनीय समाजकार्य.

३. राजकीय क्षेत्र : स्वच्छ आणि पारदर्शक राजकारण, समाजहितासाठी केलेले राजकीय योगदान.

४. कृषी क्षेत्र : शेतीमध्ये नवनवीन प्रयोग, सेंद्रिय शेती, शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी कार्य.

५. उद्योग क्षेत्र : ग्रामीण भागात उद्योग उभारून रोजगार निर्मिती करणारे उद्योजक.

६. सहकार क्षेत्र : सहकार चळवळीच्या माध्यमातून शेतकरी आणि सर्वसामान्यांना न्याय देणारे कार्य.

७. समाजभिमुख कार्य : पत्रकारिता. पर्यावरण, आरोग्य, कला, क्रीडा, साहित्य या क्षेत्रातील विशेष योगदान.

प्रस्ताव कसा आणि कुठे पाठवावा ?

इच्छुक व्यक्तींनी आपला प्रस्ताव व्यवस्थित तयार करून त्यामध्ये आपला संपूर्ण बायोडाटा, आपण केलेल्या कार्याची सविस्तर माहिती, कार्याचे फोटो, वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातम्यांच्या कात्रणांच्या झेरॉक्स, मिळालेले पुरस्कार, प्रमाणपत्रे आदी कागदपत्रे जोडावीत.

सदर प्रस्ताव दि. ११ नोव्हेंबर २०२६ पर्यंत खालील पत्त्यावर पोस्टाने अथवा प्रत्यक्ष उपस्थित राहून जमा करावा.

पत्ता : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, कार्यालय – अकोले, जि. अहिल्यानगर.

प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावांची छाननी संघाच्या राज्यस्तरीय निवड समितीकडून केली जाणार असून, प्रत्येक प्रस्तावाचा जाणीवपूर्वक आणि सकारात्मक विचार करून पात्र व्यक्तींची पुरस्कारासाठी निवड केली जाईल.

तरी राज्यातील जास्तीत जास्त पात्र आणि कर्तृत्ववान व्यक्तींनी व संस्थांनी आपले प्रस्ताव अंतिम मुदतीपूर्वी पाठवावेत, असे आवाहन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे (मो. ९४२३३८८ ५०८...७५८८१५०००१.९४२३४६७२७२) यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी निघालेल्या भाविकाला कंटेनरने चिरडले

## भाविकांवर काळाचा घाला १ जागीच ठार तर ६ गंभीर जखमी; राष्ट्रीय हायवेवर नियंत्रण कोणाचे हा प्रश्न गंभीर बनला आहे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : मुंबई - हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरील नळदुर्ग बायपास हायवेवर रायता हॉटेल जवळ सकाळी नऊच्या सुमारास पाठीमागून धडक दिल्याने तुळजापूरच्या आई तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी निघालेल्या भाविकाला कंटेनरने चक्क चिरडले तर सहा भाविक गंभीर जखमी झाल्याने परत नळदुर्ग बायपासवर आपघाताचे प्रमाण वाढले का? आशी खळबळ परिसरामध्ये उडाली आहे



कर्नाटकातील बसवकल्याण कडुन तुळजापूरच्या आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी तुळजापूरकडे पायी चालत निघालेल्या भक्तावर काळाने घाला घातल्याने परिसरात शोक कळा पसरली आहे

हैदराबादहून मुंबईच्या दिशेने जाणारा कंटेनर एम एच ०४ एन १६७१ या कंटेनर ने नळदुर्ग बायपास जवळ आला असता चालकाने नियंत्रण सुटल्यामुळे कंटेनर थेट पायी जाणाऱ्या भाविकांच्या अंगावर गेल्याने हा भीषण अपघात झाला आहे या आपघातात एका भाविकाचा जागीच मृत्यू झाला आहे सदरील सहा जखमींना नळदूर्ग येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

जखमीना डोके , हात , पायांना गंभीर दुखापती झाल्या आहेत घटनेची माहिती मिळताच नळदुर्ग येथील जगद्गुरु रामानंद आचार्य नरेंद्रचार्य महाराज संस्थांची रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली

पोलिसांच्या मदतीने जखमींना नळदुर्ग येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले बसवकल्याण होऊन आलेल्या गुरुसिद्ध बाबुराव कुंभार वय ३० वर्ष राहणार बसवकल्याण

असे मताचे नाव असून तर जखमीमध्ये अनुसार बी रमेश वय वर्ष ३३ संगमेश्वर बसवराज बेलुरे ३३ वय वर्ष रोहन दशरथराव हंचाटे महादेव रामलिंगआप्पा मठपती मडीवळप्पा चंद्रकांत बिराजदार हे सर्व राहणार बसवकल्याण कर्नाटक राज्यतील आसल्याची माहिति मिळाली आहे



आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी पायी जाणाऱ्या भाविकांवर काळाने घाला घातला असून अपघातामध्ये पुन्हा हायवे बायपास ऐरणीवर येतो की काय आसा सवाल नागरिकातुन बोलला जात आहे

भाविकांच्या संरक्षणा साठी पोलीस दलाची तुकडी जागोजागी उभारायला हवी कंटेनरच्या चालकाचे नियंत्रण सुटल्याच्या कारणाने हा अपघात घडला असून संबंधितावर गुन्हा दाखल झाला आहे पुढील तपास नळदुर्ग पोलीस करीत आहेत

# इलेजियम क्लबच्या दोन खेळाडूंची जिल्हा अंडर-१४ क्रिकेट संघात निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



तन्मय वाघमोडे



हर्ष जगताप

सोलापूर/प्रतिनिधी : इलेजियम क्लब, जामश्री सिटी, सोलापूर येथील जीकेसीआय (ऋग्र्ू घळींीिंशप उीळलज्ञशीं खपवळर लरवशा्र) क्रिकेट अॅकॅडमीच्या दोन होतकरू खेळाडूंची सोलापूर जिल्हा अंडर-१४ क्रिकेट संघासाठी निवड झाली आहे. तन्मय वाघमोडे आणि हर्ष जगताप यांनी आपल्या सातत्यपूर्ण सराव, मेहनत, शिस्त आणि क्रिकेटमधील उत्कृष्ट कौशल्याच्या जोरावर ही उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

लहान वयातच क्रिकेट क्षेत्रात आपली गुणवत्ता सिद्ध करणाऱ्या या दोन्ही खेळाडूंनी निवड प्रक्रियेत चांगली कामगिरी करत जिल्हा संघात स्थान मिळविले. त्यांच्या या निवडीमुळे इलेजियम क्लब तसेच जीकेसीआय क्रिकेट अॅकॅडमीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

**तन्मय वाघमोडे व हर्ष जगताप यांची उल्लेखनीय कामगिरी**

दोन्ही खेळाडूंना जीकेसीआय क्रिकेट अॅकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक अजिंक्य बाहुले यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित प्रशिक्षण मिळत आहे. खेळाडूंचे फलंदाजी, गोलंदाजी, क्षेत्ररक्षण तसेच तांत्रिक कौशल्य विकसित करण्याबरोबरच त्यांच्यात सामन्याची मानसिकता आणि आत्मविश्वास निर्माण करण्यावर अॅकॅडमीचा विशेष भर दिला जातो. सातत्यपूर्ण सराव आणि प्रशिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे तन्मय वाघमोडे आणि हर्ष जगताप यांनी आपल्या खेळात चांगली प्रगती केली आहे.

इलेजियम क्लबचे स्पोर्ट्स मॅनेजर राजकुमार धड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली अॅकॅडमीतील खेळाडूंना दर्जेदार क्रीडा सुविधा, सरावासाठी पोषक वातावरण आणि आवश्यक प्रोत्साहन दिले जाते. ग्रामीण तसेच शहरी भागातील गुणवंत खेळाडूंना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने क्लब आणि अॅकॅडमीकडून प्रयत्न केले जात आहेत.

तन्मय वाघमोडे आणि हर्ष जगताप यांच्या जिल्हा अंडर-१४ संघातील निवडीबद्दल इलेजियम क्लबचे व्यवस्थापन, मुख्य प्रशिक्षक अजिंक्य बाहुले तसेच जीकेसीआय क्रिकेट अॅकॅडमीच्या संपूर्ण टीमने त्यांचे अभिनंदन केले आहे. तसेच आगामी स्पर्धांमध्ये उत्तम कामगिरी करून सोलापूर जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छाही त्यांना देण्यात आल्या.

मेहनत, योग्य मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर तन्मय व हर्ष भविष्यात क्रिकेट क्षेत्रात निश्चितच मोठी मजल मारतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# दुधनीत पदवीधर मतदान ७८.६६ टक्के, तर शिक्षक मतदान ९४.३३ टक्के

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी प्रतिनिधी/निंगप्पा निंबाळ : अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथे पदवीधर व शिक्षक मतदानाची प्रक्रिया पार पडली. यामध्ये पदवीधर मतदानाची टक्केवारी ७८.६६ टक्के, तर शिक्षक मतदान केंद्रावर ९४.३३ टक्के मतदानाची नोंद झाली.

दुधनी येथील पदवीधर मतदानात एकूण १५० मतदारांपैकी ११८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये पुरुष मतदार १०४ आणि महिला मतदार १४ यांचा समावेश असून, एकूण मतदानाची टक्केवारी ७८.६६ टक्के झाली.

शिक्षक मतदान केंद्रावर ९४.३३ टक्के मतदान

दुधनी येथील शिक्षक मतदान केंद्र क्रमांक १११/३१० येथे सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडली. या केंद्रावर एकूण ५३ मतदारांपैकी ५० मतदारांनी मतदान केले. यामध्ये ४५ पुरुष आणि ५ महिला मतदारांचा समावेश आहे. त्यामुळे शिक्षक मतदानाची टक्केवारी ९४.३३ टक्के नोंदविण्यात आली.

वेळेनुसार शिक्षक मतदानाची आकडेवारी :

- सकाळी ८ ते १० : १० पुरुष, १ महिला - एकूण ११
- सकाळी १० ते १२ : १७ पुरुष, ३ महिला - एकूण २०
- दुपारी १२ ते २ : १२ पुरुष, ० महिला - एकूण १२
- दुपारी २ ते ३ : ४ पुरुष, १ महिला - एकूण ५
- दुपारी ३ ते ४ : २ पुरुष, ० महिला - एकूण २

अशा प्रकारे शिक्षक मतदान केंद्रावर ४५ पुरुष व ५ महिला अशा एकूण ५० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. दुधनी येथे पदवीधर आणि शिक्षक मतदान प्रक्रियेत मतदारांनी सहभाग नोंदविला.

# पंढरपूर तालुक्यातील गुन्हेगारीला आळा घालणार कोण? अवैध वाळू उपसा, खाजगी सावकारी आणि टवाळखोरच्या दक्षतेमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : महाराष्ट्र राज्यातील महत्त्वाची तीर्थक्षेत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंढरपूरच्या विकासासाठी राज्य शासनाकडून विविध योजना आणि विकास आराखडे राबवण्यात येत आहेत. शहराच्या विकासासाठी कॉर्डावर प्रकल्पाची चर्चा सुरू आहे. यासाठी पंढरपूर येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालय अशी प्रशासकीय कार्यालय मिळाले आहेत. आदर्श शहरातील कायदा व संस्थेचा प्रश्न ऐरणीवर असल्याचे नागरिकांतून व भाविकांमधून व्यक्त होत आहेत

अवैद्य वाळू उत्खनन खाजगी सावकार की, आणि किरकोळ कानावरून होणारी दादागिरी यांना आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासन ठोस पावली उचलावीत अशी भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

रपूर हे धार्मिक केंद्र नसून लाखो भाविकांची श्रद्धास्थान आहे आषाढी व कार्तिकी यात्रेमध्ये वर्षभर येथे भाविकांची मोठी उर्दळ असते अशा परिस्थितीत शहरातील नागरिकांसह भाविकांमध्ये सुरक्षेचे वातावरण मिळणे आवश्यक आहे. मात्र काही शहरात दादागिरी घडत असलेली चर्चा सुरू असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना सुरक्षितता प्रश्न निर्माण होत आहे.

आणि परिसरात अवैद्य वळू उपसा तसेच खाजगी सावकारकीच्या व्यवहारामधून आर्थिक ही संबंध होत आहेत. असा आरोप नागरिकांमधून होत आहे. पैसा व बाळाचा वापर करून सरसमोरमध्ये दहशत निर्माण करणे असा प्रयत्न काही व्यक्तीकडून होत असलेल्या तक्रारी व्यक्त होत आहे या प्रकारांना वेळीच आळा घातला नाही तर शहरातील कायदा सुव्यवस्थाचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची भीती नागरिकांमधून होत आहे.

हलगी सावकाराच्या आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकरीची पिळवणूक केली जात असल्याची त्याचे निपक्षपणे चौकशी होणे गरजेचे आहे. ऊस पुरवायच्या आधारे संबंधितावर कारवाई करणे ही ठोस भूमिका घेणे महत्त्वाचे आहे.

यवस्तीत दोन गटाच्या राड्याने मध्यवर्ती भागात दोन गटांमध्ये राडा झाली जी घटना घडल्याची सांगितली जात आहे अशा घटना घडत असल्यामुळे नागरिकांनी बायोगामध्ये सुरक्षेतेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. गरजेच्या परिषद असे घडल्यास निष्पाप नागरिकांना त्याचा फटका बसणार आहे.

# भिवंडीतील खावडा वीज प्रकल्प बाधित शेतकऱ्यांना वाढीव मोबदला द्या; खासदार बाळ्या मामा यांची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील अति उच्चदाब वीजवाहिन्यांच्या मनोऱ्यांसाठी आणि वीजवाहिन्यांच्या मार्गात बाधित झालेल्या शेतजमिनींना वाढीव मोबदला देण्यात यावा, अशी मागणी खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी केली आहे. यासंदर्भात गुरुवारी राष्ट्रवादी(शरद पवार)चे युवा नेते सुमित म्हात्रे यांनी भिवंडी उपविभागीय अधिकारी अमित सानप यांची भेट घेतली व शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

खावडा पॉवर ट्रान्समिशन लिमिटेडकडे देण्यात आलेल्या लिलो ऑफ बाभळेश्वर-पडघे (एम) ४०० केव्ही डीसी लाईन (बोईसर-२) या प्रकल्पांतर्गत भिवंडी तालुक्यातील २० गावांचा समावेश आहे. या परिसरात एमएमआरडीए, एमएसआरडीसी तसेच विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे औद्योगिकीकरण आणि नागरीकरणाचा वेग वाढला आहे. त्यामुळे बाधित शेतजमिनींच्या मोबदल्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

सध्या वीजवाहिन्यांचे मनोरे उभारण्यासाठी बाधित जमिनीला प्रतिगुंठा ६ लाख ६० हजार रुपये, तर वीजवाहिन्यांच्या मार्गासाठी बाधित जमिनीला प्रतिगुंठा ९९ हजार रुपये मोबदला दिला जात आहे. मात्र, या दोन्ही प्रकारच्या मोबदल्यात मोठी तफावत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे.

**२० गावांतील शेतकऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर**

वीजवाहिन्यांच्या मार्गात येणाऱ्या झाडांना योग्य मोबदला मिळत नसल्याची तक्रारही यावेळी शेतकऱ्यांकडून करण्यात आली. ताडाच्या झाडासाठी मिळणाऱ्या ७२ हजार रुपयांच्या मोबदल्याच्या तुलनेत त्यापासून शेतकऱ्यांना दररोज १२०० ते १५०० रुपये उत्पन्न मिळत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

वीजवाहिन्यांखालील बाधित जमिनीला किमान प्रतिगुंठा अडीच लाख रुपये, तर बाधित झाडांसाठी दोन लाख रुपये मोबदला द्यावा. तसेच शेती, शेतकामे आणि रस्त्यांसाठी आवश्यक परवानग्यांची प्रक्रिया सुलभ करून यूडीसीआरच्या नियमावलीत योग्य बदल करावेत अशी मागणी खासदार सुरेश म्हात्रे यांनी केली आहे.

# संविधानाच्या रक्षणासाठी उद्या सोलापुरात तिरंगा मार्च

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : देशाचे संविधान वाचविणे, निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमितता आणि पेपरफुटीच्या विरोधात 'आम्ही, भारताचे लोक' या संघटनेच्या वतीने रविवारी, २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता सोलापुरात संविधान तिरंगा मार्च काढण्यात येणार आहे, अशी माहिती समीउल्लाह शेख यांनी पत्रकार परिषदेत दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून या मार्चला सुरुवात होऊन जिल्हा परिषदेच्या पुनम गेट येथे त्याची सांगता होणार आहे. यानंतर तेथे जाहीर सभा होणार आहे. या सभेला महाराष्ट्रातील प्रसिद्ध शोधपत्रकार निरंजन टकले यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. देशातील तरुणांमधील बेरोजगारी, शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या आत्महत्या, निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमितता आणि स्पर्धा परीक्षांच्या पेपरफुटीच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले आहे. दिल्लीतील जंतर-मंतर येथे संविधानाच्या रक्षणासाठी तरुण, विद्यार्थी आणि सामान्य नागरिक आंदोलन करीत असून, आंदोलनकर्त्यांना अडविणे आणि त्यांच्यावर कारवाई करणे ही चिंतेची बाब असल्याचे आयोजकांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस यशवंत फडतरे, फारूख शेख, साधना गायकवाड, विशाखा उबाळे, पायल कडाळे, आफताब पटेल, खालीद मन्सूर आदी उपस्थित होते.

**जनसंवाद कार्यक्रमात मनमोकळी चर्चा**

**रेल्वे प्रशासनाच्या वतीने पंढरपूर मध्ये जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन**

# देशातील प्रमुख तीर्थस्थळांना पंढरपूरशी जोडण्याचा प्रयत्न : रेल्वे प्रबंधक डॉ. सुजित मिश्रा







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठलाच्या भक्तांना माफक दरात आणि सुरक्षितपणे पंढरपूरमध्ये पोहचण्याचे रेल्वे सेवा हे प्रमुख मध्यम आहे. इथे येणाऱ्या वारकरी भाविकांना मूलभूत सेवा सुविधा देण्याबरोबरच देशातील प्रमुख तीर्थस्थळांना पंढरपूर कसे जोडता येईल यासाठी रेल्वे प्रशासन प्रयत्नशील असल्याचे मध्य रेल्वेच्या सोलापूर मंडलाचे मंडल प्रबंधक डॉ सुजीत मिश्रा यांनी स्पष्ट केले.

रेल्वे प्रशासनाच्या वतीने पंढरपूर मध्ये जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात उपस्थितांनी रेल्वेकडून अधिकच्या सेवासुविधा मिळाव्यात अशी मागणी केली. त्यावर डॉ मिश्रा यांनी आश्वासक उत्तरे दिली.

प्रवाशांच्या अडचणी समजून घेणे, त्यांच्या अपेक्षांनुसार रेल्वे सेवांमध्ये सुधारणा करणे आणि रेल्वे प्रशासन व नागरिक यांच्यात थेट संवादाचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा या जनसंवाद कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमादरम्यान डॉ. सुजीत मिश्रा यांनी उपस्थित नागरिक व प्रवाशांच्या समस्या, सूचना आणि अपेक्षा जाणून घेतल्या. त्यांनी सर्वांशी मनमोकळेपणाने संवाद साधत त्यांच्या विविध प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. तसेच रेल्वे प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि रेल्वे सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी उपस्थितांकडून मौल्यवान सूचना व अभिप्रायही जाणून घेतले.

पंढरपूर हे श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी देशभरातून लाखो भाविक येतात. पंढरपूर हे प्रमुख तीर्थक्षेत्र असल्याने, येथील रेल्वे प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात, प्रवास अधिक सुखकर व्हावा आणि रेल्वे सेवांचा दर्जा सुधारावा, यासंदर्भातही या संवादाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

या कार्यक्रमास झोनल रेल्वे कन्झ्युमर कन्सल्टेटिव्ह कमिटीचे सदस्य प्रणव परिचारक, ग्राहक मंचाचे अध्यक्ष शशिकांत हरिदास, मुख्य वाणिज्य निरीक्षक अमोल जोशी, स्टेशन प्रबंधक के के मिश्रा, अंकित सिंग, आपीएफ प्रमुख सुहास जाधव, रमेश काळे आदीसह मोठ्यासंख्येने विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

# पत्रकारितेत विश्लेषण, संयम आणि स्वतंत्र विचार महत्त्वाचे : सुशीलकुमार शिंदे

## महाराष्ट्र संपादक परिषदेच्या वतीने विक्रम खेलबुडे यांचा कै. यशवंत पाध्ये स्मृती पुरस्काराने सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : नागेश श्रीचिप्पा ) पत्रकारितेचे मुख्य काम केवळ बातम्या देणे नसून घडणाऱ्या घटनांचे विश्लेषण करणेही महत्त्वाचे आहे. पत्रकारांनी राजकीय आणि सामाजिक घडामोडींचा अभ्यास करून त्यातील चांगल्या-वाईट बाबी जनतेसमोर मांडल्या पाहिजेत. पत्रकारांनी कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित व्यक्तींच्या कामाचे मूल्यमापन करताना त्यातील चांगल्या आणि त्रुटीपूर्ण बाबींचे विश्लेषण करावे. पत्रकारितेत संयम, अभ्यास आणि स्वतंत्र विचार यांना महत्त्व आहे, असे प्रतिपादन माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले.



महाराष्ट्र संपादक परिषद, मुंबई यांच्या वतीने कै. यशवंत पाध्ये स्मृती राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभ शुक्रवारी सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या हॉलमध्ये आयोजित करण्यात आला होता. यावेळी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीकुमार शिंदे यांच्या हस्ते श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दैनिक संचारचे उपसंपादक विक्रम खेलबुडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर नागणसूर बम्मलिंगेश्वर मठाचे मठाधिपती श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी, महाराष्ट्र संपादक परिषदेचे अध्यक्ष संजय मलमे, कार्याध्यक्ष प्रकाश कुलथे, ज्येष्ठ विधिज्ञ धनंजय माने, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष तथा नगरसेवक मनीष केत, राज्य अधिस्वीकृती समितीचे सदस्य प्रमोद बोडके, विभागीय अधिसुकृती समिती सदस्य गोरख तावरे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, पाच हजार रुपये रक्कम, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे पुढे म्हणाले, पत्रकारांच्या सुविधा आणि कल्याणासाठी काम करण्याची तळमळ असणे आवश्यक आहे. केवळ पत्रकारितेचे लेबल लावून पुढे जाण्यापेक्षा पत्रकारांच्या प्रश्नांसाठी प्रत्यक्ष काम करणे महत्त्वाचे आहे. पत्रकारांच्या निवासासाठी सोलापुरात उभारण्यात आलेल्या गृहनिर्माण प्रकल्पाचे त्यांनी विशेष कौतुक केले. ग्रामीण भागातील पत्रकारांना शहरात राहणे आणि घरभाडे परवडणे कठीण असते. अशा पत्रकारांसाठी निवासाची व्यवस्था उभी करणे ही महत्त्वाची आणि कौतुकास्पद बाब आहे. समाजातील चांगल्या कामांची दखल घेणे, त्यांना प्रसिद्धी देणे आणि संबंधितांना प्रोत्साहन देणे ही पत्रकारितेची सकारात्मक भूमिका आहे. राजकीय आणि सामाजिक विचारांचा अभ्यास करण्यासाठी वाचन आवश्यक आहे.

यक्ष संजय मलमे यांनी महाराष्ट्र संपादक परिषदेच्या कार्याचा आढावा मांडत आठवणींना उजाळा दिला. यापूर्वी हा पुरस्कार (स्वर्गीय) बाळासाहेब ठाकरे यांनाही देण्यात आला होता. या पुरस्काराची मोठी परंपरा असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी ड. धनंजय माने, मनीष केत यांचीही भाषणे झाली. महाराष्ट्र संपादक परिषदेचे कार्याध्यक्ष प्रकाश कुलथे यांनी प्रास्ताविक केले. श्रमिक पत्रकार संघाचे खजिनदार विजय गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले तर सरचिटणीस आफताब शेख यांनी आभार मानले.

**गुणेषु पूजास्थानं न च लिंगं न च वयः : श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी**

श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी म्हणाले, चांगले कार्य करणाऱ्या व्यक्तीचा गौरव हा त्याच्या वयावर किंवा इतर कोणत्याही बाबीवर अवलंबून नसतो, तर त्याच्या गुणांवर आणि कार्यावर अवलंबून असतो. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' आणि 'परोपकारार्थमिदं शरीरम्' ही भावना मनात ठेवून समाजासाठी निष्ठेने काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान होणे आवश्यक आहे. पत्रकार संघाचे १४ वर्षे अध्यक्षपद सांभाळून पत्रकारांच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या विक्रम खेलबुडे यांना मिळालेला पुरस्कार हा त्यांच्या कार्याचा गौरव आहे, असेही श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी म्हणाले.

**पुरस्काराची रक्कम दुष्काळग्रस्तांना देणार : खेलबुडे**

सत्कारमूर्ती विक्रम खेलबुडे यांनी पुरस्काराच्या रूपाने मिळालेली पाच हजार रुपयांची रक्कम दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी देण्याची घोषणा केली. ही रक्कम लवकरच सोलापूरचे जिल्हाधिकारी यांच्याकडे सुपूर्द करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

---

# मस्सा(खं) येथील दिव्यांग शेतकरी अण्णासाहेब फरताडे यांचा कृषी कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील मस्सा (खं) येथील शेतकऱ्याचे महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत (२०१९-२०) मध्ये लागवड केलेल्या आंबा फळबागेचे तिसऱ्या वर्षाचे कुशल बिल मिळाले नसल्याने मस्सा (खं) येथील शेतकऱ्याने थेट कृषी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

याबाबत तालुका कृषी अधिकारी, कळंब यांना निवेदन देण्यात आले आहे.दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, शेतकरी आण्णासाहेब चांगदेव फरताडे हे एका हाताने दिव्यांग असून त्यांनी सन (२०१९-२०) मध्ये महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत कृषी विभागाच्या माध्यमातून स्वतःच्या मालकीच्या गट नंबर ६९४ मध्ये आंबा या फळ पिकाची लागवड केली होती.

नियमानुसार या फळबाग लागवडीसाठी तीन वर्षांचे कुशल बिल मजुरी व देखभालीचे अनुदान देय असते. पहिल्या दोन वर्षाचे बिल मिळाले, मात्र तिसऱ्या वर्षाचे कुशल बिल आजतागायत मिळालेले नाही.

कुशल बिल मिळावे म्हणून य शेतकऱ्याने तत्कालीन कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क साधला होता. त्यानुसार त्यांनी शेतात येऊन गट नंबर ६९४ मधील आंब्याच्या झाडांची पाहणी केली आणि बिलासाठी आवश्यक पावत्या मागितल्या. शेतकऱ्याने त्या पावत्याही दिल्या आहेत.

त्यानंतर संबंधित कृषी सहाय्यकाने तुमचे कुशल बिल एम. बी. रेकॉर्डमध्ये नोंद करून पुस्तिकेसह कृषी विभाग कार्यालयात दाखल केले आहे असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर शेतकऱ्याने कृषी कार्यालयात वारंवार हेलपाटे मारूनही बिल मिळाले नाही.

या संदर्भात त्यांनी कार्यालयात दोन-तीन वेळा संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेतली, तरीही कुठलाही ठोस प्रतिसाद त्यांना मिळाला नाही. त्यांनी तिसऱ्या वर्षाचे कुशल बिल तात्काळ मिळवून द्यावे, अन्यथा तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कळंब यांच्या समोर बेमुदत आमरण उपोषणास बसणार असल्याचे त्यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.

सदरील निवेदनाची एक प्रत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना देखील देण्यात आली आहे.

**कळंब कृषी विभागाअंतर्गत मस्सा(खं) येथील दिव्यांग शेतकरी अण्णासाहेब चांगदेव फरताडे यांनी आंबा या फळ झाडाची लागवड करून मेहनतीने जोपासना केली असेल. आणि त्या फळबागाचे तिसऱ्या वर्षाचे कुशल अनुदान मिळवण्यासाठी एका दिव्यांग शेतकरी पुत्रास आमरण उपोषण करावं लागतं असेल तर शेतकऱ्यांच्या बाबतीमधील हे मोठे दुर्दैव आहे. कृषी विभागाकडून शेतकऱ्यास अशा पद्धतीने जाणून-बुजून पिळवणूक होत असेल तर,संबंधित अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करून एका दिव्यांग शेतकरी बांधवांला तात्काळ न्याय द्यावा. अन्यथा शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन करावे लागेल.**

**- शेतकरी नेते बब्रुवान गोरे**

# नवरात्रोत्सवानिमित्त श्री रुक्मिणी मातेला पारंपरिक अलंकारांचा साज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : नवरात्र महोत्सवानिमित्त श्री क्षेत्र पंढरपूर येथील श्री रुक्मिणी मातेला पारंपरिक पोषाखासह विविध मौल्यवान अलंकार परिधान करण्यात आले आहेत. प्रथा-परंपरेनुसार करण्यात आलेल्या या साजशृंगारामुळे मातेचे रूप अधिकच मनमोहक दिसत असून, भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे.





यावेळी श्री रुक्मिणी मातेला सोन्याचा मुकुट, नवरत्नांचा हार, खड्यांची बिंदी, चिंचपेटी हिरवी, तन्मणी, सोन्या-मोत्यांचे ताणवड, चंद्रहार, मोत्याचा कंठा, पेट्यांची बिंदी, मोत्याचे मंगळसूत्र, सोन्याचे बाजूबंद, रुळजोड, पैंजणजोड, नथ आदी पारंपरिक अलंकारांनी सजविण्यात आले आहे.याबाबतची माहिती श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.

---

# साखर आयातीस केंद्राकडून दोन महिन्यांची मुदतवाढ; ३१ डिसेंबरपर्यंत शून्य शुल्कात आयात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : परकीय व्यापार महासंचालनालयाने दहा लाख मेट्रिक टन कच्च्या साखरेच्या शुल्कमुक्त आयातीसाठीची मुदत दोन महिन्यांनी वाढवली आहे. आता आयातदारांना ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत शुल्कमुक्त आयात पूर्ण करता येईल. यापूर्वीची मुदत ३१ ऑक्टोबर २०२६ अशी निश्चित होती. हा निर्णय १९ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या ऊऋड च्या अधिसूचना क्रमांक ४५/२०२६-२७ द्वारे जाहीर करण्यात आला. या मुदतवाढीमुळे वर्षाखेरपर्यंतच्या कच्च्या साखरेच्या शुल्कमुक्त आयातीची संधी खुली राहिली आहे. सरकारने परवानगी असलेल्या प्रमाणाबाबत किंवा आयटीसंबंधीच्या अटींमध्ये कोणताही बदल जाहीर केला नसला तरी हा अतिरिक्त वेळ आयातदारांना कोट्याअंतर्गत मालाची पाठवणी पूर्ण करण्यास मदत करू शकतो.

केंद्र सरकारने ऑगस्ट २०२६ मध्ये टॅरिफ रेट कोटा योजनेंतर्गत दहा लाख मेट्रिक टन कच्च्या साखरेची शुल्कमुक्त आयात करण्याची परवानगी दिली होती. या कोट्यासाठी एक्सिम कोड १७०११४ अंतर्गतची कच्ची साखर पात्र ठरते. नव्या अधिसूचनेनुसार केवळ आयात खिडकीची वैधता वाढवण्यात आली असून, एकूण कोट्याचे प्रमाण आणि इतर अटी जैसे थ्या राहिल्या आहेत. टॅरिफ रेट कोट्यामुळे एखाद्या उत्पादनाची विशिष्ट मात्रा प्राधान्य दराने आयात करता येते. या प्रकरणात या कोट्यामध्ये १० लाख मेट्रिक टन कच्च्या साखरेचा समावेश आहे.

देशांतर्गत साखरेची उपलब्धता सुधारणे आणि पुरवठ्याच्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर किमतींवरील दबाव कमी करणे, हा या निर्णयामागचा उद्देश आहे. जवळपास एका दशकानंतर भारताने साखर आयातीची मोठी योजना राबवली आहे. न वापरलेला आयात कोटा परत करण्यासाठीची मुदतही १५ नोव्हेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे.

# दरेगावच्या सुपुत्राची उत्तुंग भरारी: दिपक मांन्टे यांची यवतमाळ येथे 'सहाय्यक संचालक' पदी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/ बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर ग्रामीण भागातील तरुणांनी स्वप्न पाहिले तर ते प्रत्यक्षात उतरवता येते, हे दरेगाव (ता. सिंदखेड राजा) येथील सुपुत्र दिपक सुभाषराव मांन्टे यांनी सिद्ध करून दाखवले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी प्रशासकीय सेवेत मोठे यश संपादन केले असून, यवतमाळ येथे 'सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग' या जबाबदारीच्या पदावर ते नुकतेच रुजू झाले आहेत.



**जिल्हा परिषद शाळेपासून प्रशासकीय शिखरापर्यंतचा प्रवास**

दिपक मांन्टे यांचे प्राथमिक शिक्षण (इयत्ता १ ली ते ७ वी) दरेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले. त्यानंतर त्यांनी गावातीलच कै. भास्करराव शिंगणे विद्यालयात इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.

ग्रामीण भागातील तुटपुंज्या सुविधा आणि परिस्थितीच्या तीव्र हालअपेष्टा सोसत असतानाच, आपण एक दिवस उच्च पदस्थ अधिकारी बनून समाजाची सेवा करायची, हे स्वप्न त्यांनी मनाशी बाळगले होते.

**सामाजिक भान आणि अभ्यासाचा ध्यास**

आपल्या सेवाकार्याची सुरुवात त्यांनी समाज कल्याण विभागात 'वरिष्ठ लिपिक' म्हणून नागपूर येथे केली. नोकरीत कार्यरत असतानाही त्यांनी आपले शैक्षणिक व सामाजिक ध्येय कधीही डोळ्यांसमोरून ओझल होऊ दिले नाही.

ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी मोफत अभ्यासिका : स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या ग्रामीण भागातील मुलांना मार्गदर्शन व सोयी-सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने त्यांनी आपल्या दरेगाव या मूळ गावी सुसज्ज अशी मोफत अभ्यासिका सुरू केली.

गरजूंना मदतीचा हात: शिक्षण घेणारे तरुण असोत वा समाजातील गोरगरीब नागरिक, प्रत्येकाला शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे आणि वैयक्तिक पातळीवर मदत करणे हा त्यांचा नेहमीच मानस राहिला आहे.

**जिद्द आणि परिश्रमाचे फलित**

समाज कल्याण विभागात आयुक्त पदापर्यंत पोहोचण्याचे उच्च ध्येय उराशी बाळगून त्यांनी आपली सेवा आणि अभ्यासाची दिवटी अखंड तेवत ठेवली. त्यांच्या याच निष्ठेचे आणि कठोर मेहनतीचे फलित म्हणजे आज त्यांची यवतमाळ येथे सहाय्यक संचालक (इतर मागास बहुजन कल्याण विभाग) या महत्त्वपूर्ण पदी वर्णी लागली आहे.

त्यांच्या या उत्तुंग यशामुळे दरेगावसह संपूर्ण सिंदखेड राजा तालुक्यात आनंदाचे वातावरण पसरले असून, सर्व स्तरांतून त्यांच्यावर कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ग्रामीण भागातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांसाठी त्यांचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी ठरत आहे.

---

**डायमिथाइल कार्बोनेटच्या स्वदेशी उत्पादनाची दखल; देशाच्या रासायनिक उद्योगातील आत्मनिर्भरतेला बळ**

# बालाजी अमाईन्सला 'बेस्ट ग्रीन प्रॉडक्ट'साठी प्रतिष्ठेचा एफआयसीसीआय पुरस्कार २०२६

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बालाजी अमाईन्स लिमिटेडला फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (FICCI) तर्फे प्रदान करण्यात येणारा FICCI केमिकल्स अँड पेट्रोकेमिकल्स पुरस्कार २०२६ 'बेस्ट ग्रीन प्रॉडक्ट' या श्रेणीत प्रदान करण्यात आला. स्वदेशी रासायनिक उत्पादनांच्या विकासासाठी आणि शाश्वत औद्योगिक उपाययोजनांसाठी कंपनीने दिलेल्या योगदानाची या पुरस्काराद्वारे दखल घेण्यात आली.

१९२७ मध्ये स्थापन झालेली फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (FICCI) ही भारतातील प्रमुख औद्योगिक व व्यावसायिक संघटनांपैकी एक आहे. औद्योगिक विकास, व्यापारवृद्धी आणि आर्थिक प्रगतीला चालना देण्यात या संघटनेची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. FICCI तर्फे प्रदान करण्यात येणारे केमिकल्स अँड पेट्रोकेमिकल्स पुरस्कार रासायनिक व पेट्रोकेमिकल क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी आणि योगदानाची दखल घेऊन प्रदान केले जातात




मुंबई येथील आयटीसी मराठा हॉटेलमध्ये २२ ऑक्टोबर रोजी झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात भारत सरकारच्या रसायने आणि पेट्रोकेमिकल्स विभाग, रसायने आणि खते मंत्रालयाचे, सचिव श्री तेजवीर सिंग यांच्या हस्ते बालाजी अमाईन्स लिमिटेडचे वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी श्री. विनोद चुंगे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी डॉ. जी. व्यंकटेश सहसचिव (पेट्रोकेमिकल्स), रसायने आणि पेट्रोकेमिकल्स विभाग व श्री दीपांकर आरोन सहसचिव (रसायने) रसायन आणि पेट्रोकेमिकल विभाग, रसायन आणि खते मंत्रालय उपस्थित होते याच श्रेणीत एचपीसीएल-मित्तल एनर्जी लिमिटेड या कंपनीलाही पुरस्काराने गौरविण्यात आले.

बालाजी अमाईन्स लिमिटेडने भारतात डायमिथाइल कार्बोनेट (DMC) या महत्त्वपूर्ण रसायनाचे उत्पादन सुरू करण्याच्या उपक्रमाची या पुरस्काराद्वारे विशेष दखल घेण्यात आली आहे. लिथियम-आयन बॅटरीसह विविध औद्योगिक क्षेत्रांमध्ये या रसायनाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. देशांतर्गत उत्पादनामुळे या रसायनासाठी आयातीवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होणार असून, देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत नवीन संधी निर्माण होणार आहेत.

बालाजी अमाईन्स लिमिटेडचे महाराष्ट्र आणि तेलंगणा राज्यांत चार अत्याधुनिक उत्पादन प्रकल्प असून, कंपनी आपल्या उत्पादनांची निर्यात जगातील ५० हून अधिक देशांमध्ये करते. कंपनीचे विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून मान्यताप्राप्त स्वतंत्र संशोधन व विकास (ठऊ) केंद्र आहे. या केंद्रामार्फत विशेष रासायनिक उत्पादनांचा विकास, उत्पादन प्रक्रियेत सुधारणा आणि तंत्रज्ञानविषयक संशोधनावर भर दिला जातो.

कंपनीने रासायनिक उद्योगातील योगदानासाठी केंद्र व राज्य सरकारांसह विविध संस्थांकडून अनेक पुरस्कार आणि सन्मान प्राप्त केले आहेत. या यशाबद्दल बोलताना कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. डी. राम रेड्डी यांनी सांगितले की, हा पुरस्कार कंपनीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची तसेच व्यवस्थापन आणि सर्व कर्मचाऱ्यांच्या सामूहिक योगदानाची पोचपावती आहे. प्रत्येक यशाबरोबर अधिक चांगली कामगिरी करण्याची जबाबदारी वाढते, असे नमूद करून त्यांनी स्वदेशी उत्पादन, संशोधन आणि नवकल्पनांच्या माध्यमातून भारताला रसायने व विशेष रसायनांच्या क्षेत्रात अधिक सक्षम बनविण्यासाठी कंपनी कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले.